ग्रामपंचायतीकडून राज्य सरकारकडे पुन्हाः निहीत झालेल्या जमिनीच्या वाटपाबाबत.

-४५- -४७- (३३७)

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक जमीन १०६८/११८०३५-अ,
सचिवालय, मुंबई-३२, ३० डिसेंबर १९६८.

शासन निर्णयः- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५१ चे पोटकलम (१-ब) मधील तरतुदीनुसार कलम ५१(१) अन्वये जी गायराने किंवा इतर जमिनी ग्रामपंचायतीमध्ये निहित होत्या आणि दिनांक १ ऑक्टोबर १९६५ च्या निकटपूर्वी लागवडीखाली होत्या ती गायराने किंवा त्या जमिनी त्या दिनांकापासून अशा पंचायतीकडे निहित असल्याचे बंद होऊन त्या दिवसाच्या निकटपूर्वी अमलात असलेल्या किंवा विद्यमान असलेल्या सर्व मर्यादास, शर्तीस आणि कोणत्याही माणसाच्या हक्कास किंवा हितसंबंधास अधीन राहून राज्य सरकारकडे पुन्हा निहित झालेल्या आहेत. या तरतुदीनुसार गायराने किंवा इतर जमिनी अनधिकृतरित्या लागवडीखाली असल्या तरीही वरील दिनांकापासून राज्य सरकारकडे त्या निहित झालेल्या आहेत. अशा प्रकारे पंचातीकडून पुन्हा सरकारकडे निहित झालेल्या जमिनीचे वाटप कसे करावे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे कीं जी गायराने अथवा इतर जमिनी दिनांक १ मार्च १९६० निकटपूर्वी ३ वर्षापासून एकसाली पट्टयावर लागवडीखाली आहेत अशा जमिनी शासन निर्णय क्रमांक एल् एन् डी-३९६०-ए१ दिनांक १ मार्च १९६० तसेच नागपूर व औरंगाबाद विभागाना लागू असलेले सरकारी पडीत जमीन (वाटप) नियम या मध्ये कोणतेही अग्रक्रम असले तरीही जे १ मार्च १९५७ पासून या जमिनीचे पट्टेदार आहेत, अशा एकसाली पट्टेदारांना कायम हक्काने देण्यांत याव्यात.

२ अशा एकसाली पट्टेदारांना पट्टयावरील जमीन कायम हक्काने अशा त-हेने द्यावी की जेणे करून त्यांच्याकडे खाजगी अगर कूळ या नात्याने असलेली जमीन व पट्टयावरील सरकारी जमीन मिळून त्यांचे एकूण क्षेत्र पडीत जमीन वाटपांतील नियमानुसार एका किफायतशीर (economic ) क्षेत्रा येवढे होईल. अशा पट्टेदारांकडून काढून घेण्यात आलेल्या जादा जमीनीचे वाटप जमीन वाटप नियमातील अग्रक्रमानुसार करावे. त्याच प्रमाणे जमीन वाटप नियमातील इतर तरतुदीही अशा जमीन धारकाना लागू कराव्यात.

३ हे आदेश शासन निर्णय क्रमांक एल् एन् डी ३९६०/ए१ दिनांक १ मार्च १९६० मधील परिच्छेद १३ अन्वये तसेच नागपूर व औरंगाबाद विभागांना लागू असलेल्या सरकारी पडीत जमीन वाटप नियमामधील अनुक्रमे नियम क्रमांक (९) व नियम क्र. (१२) अन्वये शासनाला प्रदान केलेल्या खास अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यांत येत आहेत.

OFFICE OF THE COLLECTOR, RATNAGIRI
Date 7 JAN 1969
Branch

मागे पहा...

४ अनधिकृतरीत्या लागवडीखाली असल्यामुळे वरील परिच्छेद (१) मधील तरतुदीनुसार निहित होणा-या जमिनीचे वितरण करावे किंवा काय हा प्रश्न शासनाच्या अद्याप विचाराधीन असून या बाबत वेगळे आदेश नंतर देण्यात येतील •

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवानें,

अवर सचिव, महाराष्ट्र शासन •